# नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (परिवहन विभाग)

जाहिरात क्र./**१२४७**/पी.आर दिनांक :- १५/०३/२०२४

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेत परिवहन विभागाचे बळकटीकरण करण्यासाठी व नवीन दाखल होणारी Electric Buses च्या नियोजनासाठी तसेच नागरिकांना उत्तम अशी Public Transport Services उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन विभागांतर्गत प्रशासकीय व तांत्रिक बाबींबाबत दिर्घ अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची गरज आहे. यास्तव निव्वळ कंत्राटी तत्वावर खालील पदाकरिता पात्र अधिकाऱ्यांकडुन अर्ज मागविण्यात येत असून, ठोक मानधन तत्वावर व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ११ महिन्याच्या कालावधीकरिता थेट मुलाखतीद्वारे तात्पुरती नियुक्ती करावयाची आहे.

त्याकरिता पात्र इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. २७/०३/२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता, आयुक्त, सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | एकमुस्त मासिक मानधन | वयोमर्यादा | पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटी व्यवस्थापक (प्रशासन) | ०१ | रू.१,००,००० | कमाल ६५ वर्षे | १) शासकीय/निमशासकीय/ परिवहन उपक्रम (राज्यशासन/स्थानिक स्वराज्य संस्था) किमान १० वर्षे प्रशासकीय कामाचा वर्ग - १ / वर्ग - २ पदावरील अनुभव<br>२) कामगार कायदे, कामगार कल्याण, विधी विषयक, परिवहन विषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| २ | कंत्राटी व्यवस्थापक (ऑपरेशन्स) | ०१ | रू.१,००,००० | | १) शासकीय/निमशासकीय/ परिवहन उपक्रम (राज्यशासन/स्थानिक स्वराज्य संस्था) किमान १० वर्षे प्रशासकीय कामाचा वर्ग - १ / वर्ग - २ पदावरील अनुभव<br>२)परिवहन विषयक व्यवस्थापनाचा किमान १० वर्षाचा अनुभव |
| ३ | कंत्राटी व्यवस्थापक (अभियांत्रिकी) | ०१ | रू.१,००,००० | | १) शासकीय/निमशासकीय वर्ग - १ / वर्ग - २ Mechanical Engineer पदाचा किमान १० वर्षाचा अनुभव<br>२)डेपो / कारखाना देखभाल / व्यवस्थापन / उभारणी तसेच संदर्भातील अनुभव आवश्यक<br>३) इलेक्ट्रिक वाहने चार्जिंग स्टेशनबाबत अनुभव असल्यास प्राधान्य |
| ४ | कंत्राटी लेखा अधिकारी | ०१ | रू.७५,००० | | महाराष्ट्र शासनाच्या वित्त व लेखा विभागात किंवा इतर शासकीय/निमशासकीय वर्ग - १ / वर्ग - २ लेखा व वित्त विषयक पदाचा विभागात १० वर्षे अनुभव |

उमेदवारांनी दि. २७/०३/२०२४ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आयुक्त, नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि. २७/०३/२०२४ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

४. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्राच्या छायाप्रती स्वसाक्षांकीत करून जोडाव्यात.

५. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च **परिवहन विभागाच्या आस्थापनेवरून काढण्यात येईल.**

६. उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

८. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

९. प्रस्तुत नियुक्ती ठोक मानधन तत्वावर करण्यात येईल. ठोक मानधनाशिवाय इतर कोणत्याही प्रकारचा अन्य भत्ता अथवा सुविधा देण्यात येणार नाहीत.

१०. अर्जदार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

११. अर्जदार यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसावा व चारित्र्य चांगले असावे.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/-डॉ. अभिजीत चौधरी
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- १५/०३/२०२४

# <u>अर्जाचा नमूना</u>

१. पदाचे नाव :- ……………………………………………………………………………

२. अर्जदाराचे नांव :- …………………………………………………………………………..

३. पूर्ण पत्ता :- ……………………………………………………………………………

……………………………………………………………………………

भ्रमणध्वनी क्रमांक :- …………………………………………………………………………..

ई-मेल आय डी :- …………………………………………………………………………..

४. जन्म दिनांक :- ……………………………………………………………………………

५. दि. २७/ ०३ /२०२४ ला वय :- ……………………………………………………………………………

६. सेवानिवृत्तीचे वेळी /सद्यास्थितीत धारण
केलेले पद व कार्यालय :- ……………………………………………………………………………

७. शैक्षणिक पात्रता :- ……………………………………………………………………………

८. अ) सेवाकाळातील विभागीय
चौकशी सुरु आहे/ होती काय ?
ब) असल्यास विभागीय चौकशीत
शिक्षा झाली होती का ?
क) अर्जदारा विरुध्द कोणताही
गुन्हा दाखल आहे का ?
ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील

९. अनुभव :- ……………………………………………………………………………

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी